**इंडिया फाउंडेशन फॉर द आर्ट्स (IFA)**

**प्रॉजेक्ट ५६० साठी**

**प्रस्ताव प्रस्तुतीसाठी आवाहन**

**अर्ज पाठवण्याची अंतिम तारीखः २१ सप्टेंबर २०२६**

बेंगळूरूची थोडी वेगळी कल्पना करून पहा. उदाहरणार्थ बेंगळूरू एखाद्या कवीची रोजनिशी असू शकेल, किंवा एखाद्या सर्जनशील कोडरचा कर्नल, किंवा एखाद्या चित्रकाराची कार्यशाळा, किंवा एखाद्या दिग्दर्शकाचं एडिटिंग टेबल, किंवा एखाद्या कलाकाराचा रंगमंच! भिन्न समुदाय, अप्रसिद्ध स्थळं, बहुआयामी इतिहास आणि सामूहिक आकांक्षांतून उमटणाऱ्या शहराच्या नवोदित आवाजांचा कानोसा घ्या. आपल्या सामायिक भविष्याची वाटचाल आपण कल्पकतेने कशी करतो, याबद्दल तुम्हाला जाणून घ्यायचे असेल, तर प्रॉजेक्ट ५६० हे आमचे सहयोगाचे व्यासपीठ आहे.

वेगाने विस्तारणाऱ्या महानगराच्या परिचित केंद्रांच्या पलीकडे जाऊन, अनेक स्तरांचा भूतकाळ, गोंधळलेला वर्तमानकाळ आणि कल्पित भविष्यकाळ असलेल्या परिघांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी केलेले एक कलात्मक आव्हान म्हणजे प्रॉजेक्ट ५६०. बेंगळूरूचे वास्तव बहुभाषिक आहे. जात-भाषा-लिंगभेद यांचे सतत बदलत राहणारे आणि गुंतागुंतीचे वातावरण बेंगळूरूमधे आहे. तसेच बेंगळूरूमधे शहरी परिसंस्थेला आकार देणारे पर्यावरणाविषयी महत्वपूर्ण दृष्टिकोन आहेत. या सर्व गोष्टींबद्दल संवेदनशीलता बाळगून एक कलात्मक, क्युरेटोरियल आणि विद्वत्तापूर्ण हेतू जोपासणारे नेटवर्क तयार करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

बेंगळूरूचा विस्तार इतक्या वेगाने होत आहे की तो टिपणे कठीण आहे. या शहराची मूळ कलात्मक ऊर्जा केवळ औपचारिक कलादालने (व्हाईट क्यूब्स) किंवा पारंपरिक सांस्कृतिक केंद्रांपुरती मर्यादित नाही. बेंगळूरूची सर्जनशीलता, त्याचे चैतन्य गतिमान झाले आहेत. शहरी वस्त्या, नैसर्गिक ऊर्जेतून सहजपणे एकत्र आलेल्या लोकांचे समुदाय, गिग वर्कर्सच्या चळवळी, स्थलांतरितांचे समूह, मेकर स्पेसेस, वाचन गट, पेन्सिल जॅमर्स, आणि अनौपचारिक सर्जनशील अर्थव्यवस्था यांसारख्या अनपेक्षित ठिकाणी ते चैतन्य बहरते. प्रोजेक्ट ५६० चे हे पर्व बेंगळूरू शहरातील तज्ञ आणि अभ्यासकांसोबत एका सखोल, विकास-केंद्रित प्रवास (इन्क्युबेशन-लेड जर्नी) करण्यासाठी आवाहन आहे. यातून शहराचा इतिहास, अनुभवलेल्या जागा आणि कल्पित भविष्य यांच्याशी संवाद साधण्यासाठी एकत्रितपणे एक अवकाश विकसित करता यावा हा उद्देश आहे.

ज्यांतून क्युरेटेड वॉक्स; नाट्य, नृत्य आणि संगीत सादरीकरणे; इंस्टॉलेशन्स; प्रदर्शने; समुदायांसाठीचे कार्यक्रम; कॅमेरा वापरून केलेली निर्मिती किंवा कलाकृती; खेळ; कार्यशाळा; आणि प्रकाशने साकार होऊ शकतील अशा संकल्पनांचे प्रॉजेक्ट ५६० मधे स्वागत आहे.

**विकास-केंद्रित प्रवास (इन्क्युबेशन-लेड जर्नी)**

प्रोजेक्ट ५६० च्या मागील आवृत्त्यांमधे सुरुवातीपासूनच पूर्णपणे तयार प्रकल्पाची अंमलबजावणी होत असे. या पुनरारंभामधे मात्र प्रकल्प विकसित करत नेण्यावर अधिक भर दिला आहे. IFA अशा बेंगळूरूस्थित कलाकार आणि संशोधकांच्या शोधात आहे जे 'बेंगळूरू - एक शहर' ह्या संकल्पनेवर विचारमंथन करून समविचारी सर्जनशील कलाकारांच्या गटासोबत परस्पर संवादातून नवनवीन सर्जनशील कल्पना विकसित करू इच्छितात. इच्छुक व्यक्तींना प्रस्ताव प्रस्तुतीसाठी प्रोत्साहित केले जात आहे. निवडलेल्या अर्जदारांना सर्वप्रथम एका काटेकोर आणि सखोल विकास-केंद्रात (इन्क्युबेशन लॅबमधे) प्रवेश दिला जाईल. त्यानंतर त्यांच्या प्रकल्पांची अंमलबजावणी केली जाईल.

नोव्हेंबर महिन्यातील दोन आठवड्यांमधे, शनिवार-रविवार सोडून इतर १० दिवसांत, आमंत्रित मार्गदर्शकांच्या उपस्थितीत आयएफए (IFA) द्वारे विकास-केंद्राचे (इन्क्युबेशन लॅबचे) आयोजन केले जाईल. या लॅबमध्ये सामूहिक संवाद, अन्वेषण, काही ठिकाणांना भेट देणे, कार्यशाळा, आणि समविचारी लोकांबरोबर वैचारिक देवाणघेवाण यांचा समावेश असेल. यामुळे परिसरातील हस्तक्षेप, धोरणात्मक शहरीकरणाची प्रेरणा, वर्षभर चालणारी क्युरेटोरियल संकल्पना किंवा शहरावरील कलात्मक संशोधन यांबद्दलच्या कल्पनांना समृद्धी मिळेल.

प्रकल्पांच्या निष्पत्तीमध्ये ग्राफिक कथा, ॲनिमेशन, सृजनशील ललित लेखन, संगीतविषयक शोध, सादरीकरण कला, व्याख्यान-सादरीकरणे, प्रदर्शने, स्थळानुरूप इंस्टॉलेशन्स, सृजनशील कोडिंग बूटकॅम्प, सिंथजॅमिंग, कलात्मक संशोधन प्रबंध, निबंध चित्रपट किंवा आंतरविद्याशाखीय कलाकृती यांचा विविध प्रकारे समावेश असू शकतो. या सर्वांचे सादरीकरण सार्वजनिक आणि प्रत्यक्ष स्वरूपात असणे आवश्यक आहे. गरज भासल्यास, त्यात अंशतः आभासी (व्हर्च्युअल) घटकांचाही समावेश असू शकतो.

**प्रकल्पाचा कालावधी**

८ महिन्यांपर्यंत

**बजेट**

जास्तीत जास्त रु. ४,००,०००/-

**प्रकल्प प्रस्ताव कोण पाठवू शकतं?**

एका किंवा विविध कलाप्रकारांत काम करणाऱ्या व्यक्तींकडून आम्ही प्रस्ताव मागवत आहोत. यामध्ये खालील व्यक्तींचा समावेश असू शकतो:

- संगीत, ध्वनी, लेखन, नृत्य, नाटक, कठपुतळी, कथाकथन, जादू, सर्कस आणि इतर कला निगडीत क्षेत्रांमधील कलाकार
- चित्रपट (माहितीपट आणि काल्पनिक कथा), ॲनिमेशन, छायाचित्रण, इन्स्टॉलेशन, नवीन माध्यमे, क्रिएटिव्ह कोडिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबॉटिक्स, इंटरॅक्टिव्ह कला, गेमिंग/कॉन्सेप्ट कला,

चित्रकला, शिल्पकला, छाप निर्मिती, कॉमिक पुस्तके, ग्राफिक नॅरेटिव्ह, आर्टिस्ट बुक्स, आणि इतर दृश्य कला प्रकारांमधे काम करणारे कलाकार

- क्युरेटर्स, विशेषतः गॅलरी संदर्भाबाहेर काम करणारे
- कवी, कादंबरीकार, लघुकथा लेखक, नाटककार, चित्रपट पटकथा लेखक, कॉमिक्स लेखक, गेम लेखक, क्रिएटिव्ह नॉनफिक्शन लिहिणारे, साहित्यिक कलांमध्ये काम करणारे
- आंतरविद्याशाखीय विभागामध्ये कार्य करणारे अभ्यासक
- बेंगळूरूचे रहिवासी

**प्रस्ताव पाठवण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे:**

प्रस्ताव पाठवताना त्यात खालील माहितीचा समावेश करा:

- आपली विद्यमान कला, आवड आणि चिंतन परीघ
- बेंगळूरूविषयी तुमच्या कलात्मक चिंता किंवा संशोधनात्मक प्रश्न, विशेषतः त्याच्या परिघांवर, दैनंदिन बहुभाषिक वास्तवांवर आणि पर्यावरणीय मुद्द्यांवर
- प्रकल्पाचा प्राथमिक तपशील, ज्यात तुम्ही सहभागी करून घेऊ इच्छित असलेले बेंगळूरूमधील संभाव्य भागीदार, समुदाय किंवा शहरी जागा यांचा समावेश असेल.
- तपशीलवार वेळापत्रक
- तपशीलांसहित अंदाजे बजेट
- या अर्जाशी संबंधित आधी केलेल्या कार्याची माहिती: यामध्ये पोर्टफोलिओ, लेखन, छायाचित्रे किंवा पूर्वीच्या कामाच्या ऑडिओ/व्हिडिओ रेकॉर्डिंग्ज यांसारख्या पूरक साहित्याचा समावेश करावा
- आपला CV, पत्ता, संपर्क क्रमांक आणि ईमेल आयडी
- आपला अंतिम प्रस्ताव, एकाच ई-मेल मधे, John Xaviers, Programme Officer: Arts Practice यांना john@indiaifa.org या ईमेल पत्त्यावर पाठवा. या ईमेल च्या सब्जेक्ट लाईन मधे: Project Proposal for Project 560 लिहा
- कोणत्याही प्रश्नांसाठी आणि स्पष्टीकरणांसाठी कृपया john@indiaifa.org या ईमेल पत्त्यावर संपर्क करा

**तुम्ही तुमचा प्रस्ताव इंग्रजी किंवा कोणत्याही भारतीय भाषेत लिहू शकता. IFA इंग्रजी व्यतिरिक्त इतरही भारतीय भाषांमधे प्रस्ताव सादर करण्यास प्रोत्साहन देते.**

**पात्रता:**

- फक्त भारतीय नागरिकच अर्ज करू शकतात. यामध्ये पीआयओ (पर्सन्स ऑफ इंडियन ओरिजिन / भारतीय वंशाच्या व्यक्ती) आणि ओसीआय (ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया / भारतीय मुळाचे परदेशी नागरिक) कार्डधारकांचा समावेश नाही.
- अर्जदारांकडे ओळख आणि नागरिकत्वाच्या पुराव्यासाठी पॅन कार्ड आणि खालीलपैकी एक असणे आवश्यक आहे - भारतीय पासपोर्ट किंवा आधार कार्ड किंवा भारतातील मतदार ओळखपत्र.
- केवळ व्यक्ती अर्ज करू शकतात. कोणत्याही प्रकारच्या संस्था अर्ज करू शकत नाहीत.
- प्रकल्पांमध्ये सहयोगी असेलेल्या सर्वांनी भारतीय नागरिक असले पाहिजे.
- प्रकल्पाच्या संपूर्ण कालावधीत तुम्ही बेंगळूरूमधे असणे आवश्यक आहे.
- IFA बरोबरच्या व्यवहारामधे आर्थिक गुन्ह्यांचा भूतकाळ असलेल्या व्यक्ती पात्र नाहीत.
- IFA सोबत मान्य केलेल्या व्यावहारिक बाबींची (डिलिव्हरेबल्स ची) पूर्तता न केलेल्या IFA अनुदानित व्यक्ती पात्र नाहीत.
- कोणत्याही कारणास्तव भविष्यात अर्ज करण्यास मनाई करणारे पत्र IFA कडून मिळालेल्या व्यक्ती पात्र नाहीत.
- IFA द्वारे राबविल्या जाणाऱ्या प्रकल्पावर सध्या काम करत असलेल्या व्यक्ती पात्र नाहीत.
- जर संयुक्त बँक खाते असेल तरच अशा एकापेक्षा अधिक व्यक्ती अर्ज करू शकतात. असे संयुक्त खाते नसलेल्या समूहांमधील केवळ एका व्यक्तीनेच समूहातील इतरांना सहयोगी म्हणून सोबत घेत अर्ज करावा.

**निवड प्रक्रिया:**

एक बाह्य पॅनेल शॉर्टलिस्ट केलेल्या प्रस्तावांचे मूल्यांकन करेल आणि अर्जदारांना त्यांचे प्रकल्प पॅनेलसमोर सादर करावे लागतील. विकास-केंद्रासाठी (इन्क्यूबेशन लॅबसाठी) प्रकल्पांची निवड आणि त्यांची अंमलबजावणी यांची घोषणा ऑक्टोबर २०२६ मध्ये केली जाईल.

**सर्व निवडलेले प्रकल्प IFA द्वारे अंमलात आणले जातील.**

**महत्त्वाच्या तारखा**

- शंका निरसनासाठी आणि प्राथमिक संकल्पना पाठवण्याची अखेरची तारीख: **११ सप्टेंबर २०२६**
- अंतिम प्रस्ताव पाठवण्याची अखेरची तारीख: **२१ सप्टेंबर २०२६**
- विकास-केंद्रासाठी (इन्क्यूबेशन लॅबसाठी) निवडलेले प्रकल्प जाहीर करण्याची तारीख: **ऑक्टोबर २०२६**
- प्रकल्प सुरू करण्याची तारीख: **नोव्हेंबरच्या सुरुवातीला**
- विकास-केंद्राचा (इन्क्यूबेशन लॅबचा) टप्पा: **१६-२७ नोव्हेंबर २०२६**

***अंतिम निवड झालेल्या कलाकारांनी विकास-केंद्राच्या (इन्क्युबेशन लॅबच्या) संपूर्ण कालावधीत प्रत्यक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहे.***

***कृपया लक्षात घ्या: मुलांसह सर्वांना साहाय्य दिले जाईल, सर्वांचा आदर केला जाईल आणि सर्वांचे संरक्षण केले जाईल असे सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी IFA वचनबद्ध आहे. अर्जदाराने सुद्धा हे पाळणे अनिवार्य आहे.***

**Namma 560. Namma Project. Namma Ooru.**